**L. C. BILL No. II OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

## सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २.

## महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

१९६६ चा महा. ४१.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २२अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " उक्त संहिता " असा केला आहे) याच्या कलम २२अ मधील, पोट-कलम (७) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :— १९६६ चा महा. ४१.

"(८) महानगरपालिकेच्या किंवा नगरपरिषदेच्या ज्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींनुसार अंतिम विकास आराखडा अधिसूचित केलेला आहे, अशा क्षेत्रातील समाविष्ट असलेल्या गायरान जमिनी, अशा अंतिम विकास आराखड्यात अशा जमिनींसाठी नेमून दिलेल्या प्रयोजनांसाठी, राज्य शासनाच्या पूर्व परवानगीने, वापरता येतील.". १९६६ चा महा. ३७.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २३० ची सुधारणा.

**३.** उक्त संहितेच्या कलम २३० मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(१) "डाकेने पाठवून," या मजकुरानंतर, "किंवा इलेक्ट्रॉनिक मेल सेवेने" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(२) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, अशी नोटीस, राज्य शासनाने नियमांद्वारे तरतूद केलेल्या अशा नमुन्यात व अशा रीतीने इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक संप्रेषणाद्वारे देखील बजाविता येईल.".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

गायरान जमीन ही विशेषतः गावातील गुरांच्या मोफत चराईसाठी (कुरण) नेमून दिलेली जमीन आहे. गायरान जमीन सर्वसाधारणपणे संरक्षित केलेली असते आणि ती सार्वजनिक प्रकल्पांसाठी किंवा इतर योग्य जमीन उपलब्ध नसल्यास हे वगळून, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) च्या कलम २२अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या काटेकोर विनियमांच्या अधीन राहून, इतर प्रयोजनांसाठी परिवर्तित करता येत नाही किंवा पट्ट्याने देता येत नाही.

**२.** काळाच्या ओघात, शहरे व इतर विकसित नागरी क्षेत्रांना लागून असलेल्या गायरान जमिनी आता गुरांच्या मोफत चराईसाठी वापरल्या जात नाहीत. तथापि, अशा जमिनीं हक्कनोंदणीपत्रकामध्ये गायरान जमिनी म्हणून दर्शविल्या आहेत. असे देखील निदर्शनास आले आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) अन्वये यथोचित प्रक्रियेचे पालन केल्यानंतर, नियोजन प्राधिकाऱ्याद्वारे तयार केलेल्या अंतिम विकास आराखड्यात नागरी क्षेत्रातील अशा गायरान जमिनी निवासी, व्यावसायिक किंवा औद्योगिक प्रयोजनासाठी नेमून दिल्या आहेत. कोणत्याही अंतिम विकास आराखड्यात अशा गायरान जमिनींचा समावेश केल्यानंतर, अशा आराखड्यात विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी अशा जमिनींचा वापर अनुज्ञेय झाला आहे.

**३.** मुंबई उच्च न्यायालयाने संतोष मधुकर भोंडवे व इतर विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर (रिट याचिका क्रमांक २०२१ ची ३०९८) या प्रकरणामध्ये, असा निर्णय दिला आहे की महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३४ किंवा ३५ अन्वये विषयांकित जमिनीच्या संबंधात प्रतिवादी क्रमांक ४ ने तयार केलेल्या विकास आराखड्यात विहित केलेल्या जमिनीचा वापर, अंमलात येईल व लागू होईल आणि गायरान जमीन म्हणून विषयांकित जमिनीच्या वापरावर अधिभावी असेल. उक्त न्यायनिर्णयात आणखी असा निर्णय दिला आहे की, जर महानगरपालिकेच्या हद्दीत कोणत्याही जमिनीचा समावेश करण्यापूर्वी तिचा महानगरपालिकेने तयार केलेल्या विकास आराखड्यामध्ये विहित केलेल्या वापराशिवाय इतर वापर असेल, तर महानगरपालिकेच्या हद्दीत समावेश केल्यानंतर, पूर्वीचा वापर अनुज्ञेय असणार नाही.

वरील बाब विचारात घेऊन, अंतिम विकास आराखड्यात विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी अशा गायरान जमिनींचा वापर, राज्य शासनाच्या पूर्व परवानगीने, करणे शक्य होण्यासाठी, उक्त संहितेच्या कलम २२अ मध्ये सुधारणा करणे इष्ट आहे, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

**४.** उक्त संहितेच्या कलम २३० मध्ये अशी तरतूद आहे की, उक्त संहितेअन्वये प्रत्येक नोटीस, ज्या व्यक्तीवर बजावयाची आहे त्या व्यक्तीला एकतर त्याची एक प्रत देऊन किंवा त्याच्या स्वाधीन करून अथवा त्याला डाकेने पाठवून बजावता येईल.

उक्त संहितेअन्वये, महसूल प्राधिकाऱ्यांकडून व्यक्तींना महसुलाचे मूल्यांकन, आकार, दावे, हक्कनोंदणीपत्रकामध्ये बदल, अपिले व पुनरीक्षण कार्यवाही, इत्यादींसारख्या विविध प्रकारच्या नोटिसा बजावल्या जातात. तथापि, उक्त संहितेअन्वये मोठ्या संख्येत नोटिस बजावयाच्या असणे, अपूर्ण पत्ते, पक्षकारांनी नोटिस न स्वीकारणे, इत्यादींसारख्या विविध कारणांमुळे, महसूल अधिकाऱ्यांकडून काढलेल्या नोटिस संबंधित पक्षकारांना कालबद्ध रीतीने बजावणे शक्य होत नाही. परिणामी, महसूल कार्यवाहीस विलंब होतो आणि निर्णय लांबणीवर टाकले जातात.

**५.** संबंधित पक्षकारांना वेळेत व योग्य प्रकारे नोटीस बजावल्याची खात्री करण्यासाठी आणि उक्त संहितेअन्वये महसूल कार्यवाही जलद गतीने पूर्ण करणे सुलभ होण्यासाठी, उक्त संहितेमध्ये नोटीस बजावण्याच्या विद्यमान पद्धतींसहित, इलेक्ट्रॉनिक मेल सेवेद्वारे किंवा विहित केलेल्या इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक संप्रेषणाद्वारे नोटीस बजावण्याची तरतूद करणे इष्ट आहे, असे वाटते.

वरील प्रयोजनांसाठी, उक्त संहितेच्या कलम २३० मध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**६.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६.

**चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड ३(२).**—या खंडान्वये, नोटीस बजावण्यासाठी इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक संप्रेषणाची नियमांद्वारे तरतूद करण्याचा आणि तसेच त्याच्या नमुन्याची व रीतीची तरतूद करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**२.** वैधानिक अधिकार सोपवण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचा आहे.

## सन २०२६ चे वि. प. वि. क्रमांक २-महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट

### (महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यातील उतारे)

### (१९६६ चा महा. अधिनियम क्रमांक ४१)

**१.** ते **२२९.** *** *** ***

**२३०.** (१) या संहितेच्या आणि तद्न्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, या संहितेअन्वयेची प्रत्येक नोटीस, ती ज्या व्यक्तीवर बजावावयाची असेल अशा व्यक्तीस किंवा तिच्या प्राधिकृत अभिकर्त्यास तिची एक प्रत देऊन किंवा स्वाधीन करून किंवा अशी प्रत, डाकेने पाठवून, बजाविता येईल किंवा उपरिनिर्दिष्ट रीतीने ती बजाविता येत नसेल तर, त्या व्यक्तीच्या माहिती असलेल्या शेवटच्या राहण्याच्या जागी किंवा ठिकाणी किंवा नोटीस ज्या जमिनीसंबंधात असेल ती जमीन ज्या गावामध्ये असेल किंवा ज्या गावात उक्त जमिनीची लागवड करण्यात येत असेल त्या गावातील सार्वजनिक ठिकाणी, कोणत्याही जागी उक्त प्रत चिकटवून, ती बजाविता येईल. नोटीस बजाविण्याची रीत.

(२) *** *** ***

**२३१.** ते **३३७.** *** *** ***

**अनुसूची.** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २.]**

**[महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.**]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव (३),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.